जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 9 JUN 2021
लोकसत्ता

# सीमाभागात कौशल्य विकासावर आधारित अभ्यासक्रम - उदय सामंत

लोकसत्ता प्रतिनिधी

कोल्हापूर : चंदगड तालुक्यातील शिनोळी येथे या शैक्षणिक वर्षापासून सीमाभागातील मराठी भाषिक विद्यार्थ्यांसाठी कौशल्य विकासावर आधारित अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहे, अशी माहिती उच्च शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी सोमवारी येथे पत्रकार परिषदेत दिली.

ते म्हणाले, राज्य शासनाने सीमाभागातील मराठी भाषिकांनी शिक्षण मिळावे यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या माध्यमातून शिनोळी येथे महाविद्यालय सुरू केले जाणार आहे. प्रारंभी तेथे कौशल्य विकासावर आधारित अभ्यासक्रम सुरू केले जाणार आहेत. यामुळे तेथील कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालयावर विपरीत परिणाम होण्याची भीती कोणी बाळगू नये. याकरिता दोन प्राध्यापक, एक अधिकारी नियुक्त करण्यात आले असून याचा आणखी विस्तार केला जाणार आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते लवकरच दूरभाष प्रणालीद्वारा याचे उद्घाटन करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 9 JUN 2021
पुण्यनगरी

# 'पाऊस पाणी संकलन आणि भूजल प्रदूषण' विषयावर वेबिनार

**कोल्हापूर :** भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेस पन्नास वर्षे पूर्ण झाल्याबद्दल सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे करण्यात येत आहे. जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा व शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल विभागाच्या संयुक्त विद्यमाने पाऊस पाणी संकलन व भूजल प्रदूषण या विषयावर वेबिनार आयोजित करण्यात आला होता. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेचे संचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी भूजलाबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती व्हावी, याकरिता राज्यातील १ लाख भूगोल, भूशास्त्र, कृषी पदवीधर व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी, तसेच नेहरू युवा केंद्र, राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन वेबिनारद्वारे प्रशिक्षण देण्यात येत आहे.